# नामजप : आधुनिक विज्ञान काय सांगते? (भाग-२)

**बापट गुरुजी**

**प्रस्तावना** – प्राचीन हिंदू संस्कृतीने पुरस्कृत केलेल्या मंत्राच्या व नामजपाच्या सामर्थ्याबाबतचे आधुनिक विज्ञानाच्या परिभाषेतील प्रकाशित झालेले काही संदर्भ आपण यापूर्वीच्या लेखात तपासले आहेत. प्रकट स्वरूपातला अथवा मनातल्या मनात एकाग्रतेने केलेला मंत्र अथवा नामरूपी शब्दोच्चार मानवी मनावर, संवेदनांवर आणि शरीरावर कसा अनुकूल परिणाम घडवू शकतो त्याचे आपण काही आधुनिक वैज्ञानिक प्रयोगांद्वारे अवलोकन केले. हे परिणाम साध्य करण्यासाठी काही महत्त्वाच्या पूर्व अटी आहेत. त्यातील सर्वात महत्त्वाची अट म्हणजे संपूर्ण शरणागती, ज्याला इंग्रजीमध्ये झीरो डॅंपिंग असे म्हणतात. संपूर्ण शरणागतीशिवाय आणि श्रद्धेशिवाय केलेल्या नामस्मरणाने अथवा मंत्राच्या पुरश्चरणाने शक्तीची पुरेशा प्रमाणात निर्मिती होत नाही व जी शक्ती निर्माण होते तिचे ग्रहणही योग्य रीतीने साधकाला करता येत नाही. सद्गुरूंशी सातत्याने अनुसंधान साधणे, या नामस्मरणाच्या दुसऱ्या महत्त्वाच्या पूर्व अटीचेही आपण अवलोकन केले. अनुसंधानाचे महत्त्व समजण्यासाठी आध्यात्मिक शक्ती संक्रमणाचे विज्ञान- रेझोनान्सच्या (समगतीस्पंदन) प्रयोगांद्वारे आपण बघितले. नामस्मरणाचे मंत्र पठणाचे संपूर्ण सामर्थ्य लक्षात येण्याकरता अजून काही पूर्व अटी आणि सिद्धांतांचे ज्ञान, विज्ञानाच्या परिभाषेत करून घेणे आवश्यक आहे, जेणेकरून ज्ञानयुक्त साधना करणे साधकांना शक्य होईल.

**सूत्रबद्ध आशय** – प्राचीन काळापासून अर्वाचीन काळापर्यंत पृथ्वीवर निर्माण झालेल्या सर्व सजीवांमध्ये मनुष्य श्रेष्ठ समजला जातो, याचे कारण विज्ञान असे सांगते की, मानवाचा मेंदू हा त्याच्या शरीराच्या वजनाच्या प्रमाणात सर्वाधिक वजनदार आहे आणि त्यामुळे मानव अधिक बुद्धिमान आहे. मानवाच्या मेंदूचे त्याच्या शरीराच्या वजनाशी असलेले प्रमाण सुमारे १:४० इतके आहे. मानवाच्या खालोखाल माकड, हत्ती यांच्या मेंदूचे त्यांच्या शरीराच्या वजनाशी असणारे प्रमाण अनुक्रमे १:९० आणि १:४४० इतके आहे. त्यामुळे ते प्राणी मनुष्याच्या खालोखाल बुद्धिमान समजले जातात. या बुद्धिमान मानवाच्या प्रगतीचा आपण आढावा घेतला तर आपल्या असे लक्षात येईल की, या प्रगतीमध्ये 'शब्दसामर्थ्य', 'अक्षर सामर्थ्य' यांचा सहभाग फार मोठा आहे. इतर प्राण्यांच्या तुलनेत मानव आपले विचार शब्दांच्या माध्यमातून उत्तम तऱ्हेने दुसऱ्यांपर्यंत पोहोचवू शकतो. काही विशिष्ट मर्यादेपर्यंत पशु-पक्षी-कीटकसुद्धा एकमेकांत संवाद साधू शकतात परंतु वर्णाक्षरांनी समृद्ध असलेली मानवी भाषा सर्वाधिक प्रगल्भ मानली जाते.

शब्दांच्या या माध्यमाचा विकासही मनुष्याच्या प्रगतीनुसार होत गेला. भाषा विकसनाचे हे कार्य आजही सुरू आहे. आजच्या आधुनिक युगात मानव आणि संगणक यांच्यात संवाद साधू शकणाऱ्या म्हणजेच निर्जीवाला सजीवाशी जोडणाऱ्या भाषांचे तंत्रज्ञान झपाट्याने विकसित होत आहे. कल्पना करा, जेव्हा मानवाला प्रथमत: अग्नीचा शोध लागला तेव्हा ही प्रक्रिया दुसऱ्याला सांगणे कसे साध्य झाले असेल?

तार्किक दृष्टया ही संवादाची प्रक्रिया तीन टप्प्यांमध्ये विकसित झाली असावी. प्रथम टप्प्यांमध्ये संपूर्ण कृती करून त्याद्वारे संदेश पोहोचवणे, त्यानंतरच्या टप्प्यामध्ये या सर्व कृतीचे सविस्तर वर्णन भाषेद्वारे करणे आणि तिसऱ्या टप्प्यात केवळ 'अग्नी प्रज्वलित कर' एवढेच शब्द उच्चारणे. सारांशाने मोठा आशय कमीत कमी शब्दात व्यक्त करणे हे भाषेचे सर्वाधिक प्रगत असे कौशल्य असून यालाच 'सूत्र' असे आपल्याकडे म्हटले आहे. कोणताही मंत्र अथवा नाम हे एखादे सूत्र किंवा सूत्रांचा समुच्चय असतो, ज्याद्वारे फार मोठा आशय कमी शब्दांमध्ये व्यक्त झालेला असतो. भारतीय संस्कृतीमध्ये पातंजल योगसूत्रे, ब्रह्मसूत्रे, धर्मसूत्रे, नारदीय भक्तिसूत्रे असे सूत्रबद्ध लिखाण मोठ्या संख्येने

निर्माण झाले. आधुनिक विज्ञानातही अशी अनेक सूत्रे आढळतात, उदाहरणार्थ, $E=mc^2$ किंवा $(a+b)^2 = a^2+2ab+b^2$ इत्यादी या सर्व सूत्रांमध्ये, प्रमेयांमध्ये मोठा आशय सामावलेला असतो.

**हेतुसापेक्ष आणि व्यक्तिसापेक्ष परिणाम** – तात्पर्याने प्रत्येक मंत्र किंवा नाम हे सूत्ररूपाने असल्याकारणाने जर त्यातील सखोल अर्थ समजून घेऊन त्याचे पठण करता आले, जप करता आला तर अपेक्षित परिणाम लवकर साध्य करता येईल. नामाचा आशय लक्षात आला की त्यातील हेतू लक्षात येतो आणि हेतूचे निश्चित आकलन झाले असेल तर अपेक्षित परिणाम साध्य करणे सुलभ होते. निरर्थकपणे केलेली शब्दांची बडबड परिणाम घडवू शकत नाही, कारण एखादा वेडासुद्धा तशी बडबड करत असतो. अर्थाशी एकरूपत्व न साधता निर्हेतुकपणे शब्दांचे उच्चारण जर मनुष्य करीत राहिला, तर त्याने काही नादसामर्थ्य निश्चित निर्माण होते. पण त्या शब्दसामर्थ्यातून शक्ती निर्मितीचा अपेक्षित परिणाम साध्य होत नाही. हे समजण्याकरिता व्यवहारातले एक सोपे उदाहरण घेता येईल.

उदाहरणार्थ एखादा निरर्थक शब्द. 'अचई' या शब्दावरून अर्थबोध किंवा त्यावरून विश्वातील कोणत्याही वस्तूचा बोध होत नाही, त्यामुळे या शब्दाच्या उच्चारणामुळे मानवी मेंदूमध्ये कोणताही आकार निर्माण होत नाही. मात्र खुर्ची, आरसा, फळा इत्यादी ज्ञात शब्दांमुळे काही विशिष्ट आकार निर्माण होतात. तसे कोणतेही अर्थबोधाचे आकार 'अचई' या शब्दामुळे मेंदूमध्ये निर्माण न झाल्यामुळे त्याच्या उच्चारणाचा कोणताही परिणाम मनुष्यावर होत नाही. पण आपण शब्द उच्चारले "अग आई ग!" या शब्दोच्चारणामुळे शब्द उच्चारण करणाऱ्याबद्दल ज्याला माया असेल तो मनुष्य चिंताग्रस्त होईल व याउलट त्याच्या शत्रूला आनंदाच्या उकळ्या फुटतील. म्हणजे अर्थ एक, उच्चारणही एकच पण परिणाम व्यक्तिसापेक्ष बदलला.

तद्वतच अर्थबोध होऊन हेतुपुरस्सर, एकाग्रतेने आणि श्रद्धेने केलेला नामजप किंवा मंत्राचे वारंवार पठण ज्याला आपल्याकडे अनुष्ठान म्हणतात हे फार मोठा परिणाम साध्य करते. जाणकाराकडून मंत्र अथवा नाम घेणे का हिताचे असते? नुसती पुस्तके वाचून स्वत:हून केलेला एखादा नामजप अपेक्षेप्रमाणे फळ देतोच असे का होत नाही? याची कारण मीमांसा केवळ आधुनिक विज्ञानाच्या माध्यमातून देणे कठीण आहे कारण विज्ञानाला यातील संपूर्ण रहस्य अजून उलगडता आले नाही. तरीही काही वैज्ञानिक निष्कर्षांच्या आधारे त्याची कारणमीमांसा आपण पुढे तपासणार आहोत.

**अर्थबोध, श्रद्धा आणि शक्तीग्रहण** – नाम किंवा मंत्राची तीन प्रकारात विभागणी सर्वसाधारणपणे करता येईल. 'नादप्रधान, अर्थप्रधान आणि शब्दप्रधान'. नादप्रधान असलेल्या मंत्राचे अथवा नामाचे पठण उच्चरवाने, वैखरी वाणीत करणे अपेक्षित असते. मूलत: कुठलेही नाम, मंत्र किंवा अक्षर हे काहीतरी नाद निर्माण करते. विश्वाची निर्मितीसुद्धा नादातून झाली असे आधुनिक विज्ञानही 'बिग बँग थिअरी'नुसार मान्य करते.

कुठलाही नाद हा तीन प्रकारच्या लहरींद्वारे निर्माण होत असतो. या लहरी लघु, मध्यम आणि दीर्घ स्वरूपाच्या असून या लहरी त्या सर्व विश्वात सामावलेल्या असतात. प्रत्येक जीवालाही स्वत:चा असा विशिष्ट नाद (स्पंदन) असतो. सारांशाने नादलहरी या शक्तीची निर्मिती, शक्तीचे वहन आणि शक्तीचे प्रोक्षण करण्यासाठी सक्षम असतात. त्यामुळे नादप्रधान मंत्र किंवा नादप्रधान नाम विशिष्ट लयीत, विशिष्ट नादात उच्चारणे आवश्यक असते. नादप्रधान मंत्राचे उत्तम उदाहरण आहे 'ॐ'! ॐ म्हणजे 'अ', 'ऊ' आणि 'म' या तीन अक्षरांचे एकत्रीकरण याला अध्यात्मात हंसमंत्र म्हणतात. या तीन अक्षरांमध्ये तीन प्रकारच्या नादलहरींचे आणि त्याद्वारे त्रिगुणांचे संतुलन साधले गेले आहे. त्यामुळेच ॐ काराचा ध्वनी विशिष्ट प्रकारे वैखरी वाणीमध्ये करणे अपेक्षित असते. तसेच वैदिक ऋचा, सूक्त किंवा मंत्राचे पठण एका विशिष्ट लयीत व तालात केले जाते. याचे कारणही हेच आहे की, हे सर्व शब्द समुच्चय नादप्रधान आहेत. त्यामुळे विशिष्ट नादाची निर्मिती तेथे आवश्यक असते.

काही मंत्र अथवा नाम अर्थप्रधान असतात. उदाहरणार्थ, 'ॐ नमो भगवते वासुदेवाय' हे नाम. त्यातला आशय, अर्थ सर्वात महत्त्वाचा असून अर्थबोधासह त्याचा जप केला तरच उचित परिणाम साध्य होतो.

काही मंत्र अथवा नाम शब्दप्रधान प्रकारातले असतात. याचे उत्तम उदाहरण म्हणजे शेगावचे सिद्धपुरुष श्रीगजानन महाराज यांनी त्यांच्या शिष्यांना दिलेले नाम, 'गण गण गणात बोते'. या नामातला निश्चित शब्दार्थ सांगता येत नाही. नाथपंथीयांचे कित्येक शाबरी मंत्रसुद्धा असे शब्दप्रधान असतात. तरीही हे नाम किंवा मंत्र बलवान आहेत, शक्तिमान आहेत कारण कोणीतरी सत्पुरुषाने त्यांना सिद्ध केले आहे. त्यात प्रचंड शक्ती प्रोक्षित केली आहे. त्या सिद्ध पुरुषांद्वारे

हा मंत्र ज्याला दिला जातो त्याने श्रद्धायुक्त अंत:करणाने, शंकाविरहित अवस्थेत सद्‌हेतुपूर्वक शब्दोच्चारण करणे सर्वात महत्त्वाचे असते. अर्थबोध पूर्णांशाने नाही झाला तरी चालतो पण नाम देणाऱ्यावर जर पूर्ण श्रद्धा असेल तरी फायदा निश्चित होतो. आध्यात्मिक शक्तीची निर्मिती आणि संचयन कसे होत असावे हे आपण पुढे बघणार आहोत.

**शक्तीलहरींचे वातावरणातील संचयन** – थर्मोडायनॉमिक्सचा (उष्णतागतिशास्त्र) पहिला सिद्धांत सांगतो की, 'येथे काहीही नष्ट होत नाही, त्याचे फक्त रूपांतरण होते'. जसे एखाद्या पदार्थावर अग्निसंस्कार केले तर त्याचे रूपांतर भस्मात होते; त्याचप्रमाणे मेंदूत प्रकटणारे विचार कंपनांच्या रूपात जेव्हा शरीरभर प्रवाहित होत राहतात, तेव्हा निश्चितच हे विचारांचे धक्के देहाबाहेर वातावरणातही स्पंदित होतात आणि काही काळ वातावरणात शिल्लक राहतात. एका उदाहरणाद्वारे हे समजून द्यायचे तर कुत्रा हा वासावरून माणसाचा माग काढू शकतो. याचाच अर्थ त्या माणसाच्या विचारलहरी तेथे शिल्लक असतात. माणसाला असा केवळ वासावरून माणसाचा माग काढता येत नाही म्हणून असा वास अथवा विचारलहरी वातावरणात नाहीत असे म्हणता येत नाहीत. कारण ती माणसाच्या इंद्रियांची मर्यादा असते. त्याचप्रमाणे काही काळानंतर कुत्रा सुद्धा असा माग काढू शकत नाही, याचे कारण कदाचित त्याच्याही घ्राणेंद्रियांना त्या मर्यादा असू शकतील.

दुसरे उदाहरण द्यायचे म्हणजे 'ईल' मासे आपल्या आयुष्यात एकदाच हजारो किलोमीटरचा प्रवास करतात आणि ईप्सित स्थळी पोहोचतात. कशाच्या आधारे आधी कधी न केलेली मार्गक्रमणा ते एवढ्या अचूकतेने करतात हे अजूनही कोडेच आहे कारण त्या इच्छितस्थळी पोहोचल्यानंतर त्यांचा मृत्यू होतो! पाण्यामध्ये त्यांचा वास रहातो म्हणावे तर पाणी सुद्धा सतत वहात असते. त्यामुळे तेथे असलेला पाण्याचा थेंब काही वर्षांनी पुन्हा तेथेच असतो असे कसे म्हणता येईल? तरीही ते मासे अचूक रस्ता शोधत जातात. या सर्व उदाहरणातून संकुल तात्पर्य निघते की, वातावरणात, विचार लहरी कोणत्या ना कोणत्या रूपात शिल्लक रहातात ते रूप अजून तरी विज्ञानाला अज्ञात आहे.

कोठल्याही कृतीमागे काही ना काही हेतू असतो आणि हेतू हा नेहमी त्या कृतीबरोबर प्रवास करतो. एखाद्याला दगड मारला, तर दगडाबरोबर मारणाऱ्याचा हेतू प्रवास करतो. एखाद्याने फुले उधळली तर फुलांबरोबर ते उधळणाऱ्याचा हेतू प्रवास करतो. जसे दोन माणसे पळत आहेत असे समजा. यातील यातील एक चोर आहे, जो स्वार्थी हेतू घेऊन पळतो आहे आणि दुसरा पोलिस, जो समाजाच्या हितार्थ चोराला पकडण्यासाठी पळतो आहे. दोघांचीही पळण्याची क्रिया एकच असते, परंतु हेतू भिन्न असल्याने त्याचे होणारे परिणामही भिन्न असतात. हे समाजाच्या दोघांना मिळणाऱ्या वेगवेगळ्या प्रतिसादातून समजून येते. याचप्रमाणे प्राचीन ऋषिमुनींनी निर्माण केलेल्या मंत्रामध्ये त्यांचा विश्वकल्याणाचा हेतू समाविष्ट आहे. वेदातील प्रार्थना या सामूहिक समृद्धीच्या आहेत. त्याच हेतूने व त्याच श्रद्धेने त्या म्हटल्या गेल्या तर त्यांचा अपेक्षित परिणाम नक्कीच होईल.

सत्पुरुषांनी दिलेल्या मंत्र किंवा नामातही त्यांचा शिष्यांच्या कल्याणाचा हेतू समाविष्ट असतो व त्याप्रमाणे ती शक्ती त्या नामात अथवा मंत्रात प्रोक्षित होते. अशा सत्पुरुषांवर ज्याची ज्याची श्रद्धा असेल त्याला त्याला त्या मंत्रपठणातून शक्ती मिळते. असा मंत्र अथवा नाम हे जेव्हा सदेह गुरूंकडून घेतले जाते तेव्हा तेथे 'मन' नामक चैतन्याची उपस्थिती आणि घेणाऱ्याची श्रद्धा यांचा संयोग हा जास्त अनुकूल परिणाम साधू शकतो. म्हणूनच गुरुमुखातून मंत्र किंवा नाम घेणे अधिक चांगले मानले जाते.

आपल्याला ज्याच्याबद्दल प्रीती आणि आदर आहे अशा एखाद्या गायकाचे गाणे तबकडीवर ऐकण्यात आणि प्रत्यक्ष सदेह समोरासमोर बसून ते ग्रहण करण्यात जो फरक असतो, साधारण तोच फरक नाम घेणाऱ्याच्या भावस्थितीत पडतो. त्याच न्यायाने नाम आणि मंत्राच्या शक्तिप्रधानतेमुळे सिद्ध झालेल्या नामाचा निश्चित आशय माहीत नसला किंबहुना त्यांना विशिष्ट शब्दार्थच नसला तरी विलक्षण श्रद्धेने पूर्ण शरणागतीसह आणि शक्य असेल तर जाणकाराकडून त्याची दीक्षा घेऊन त्याचे पठण केले तर अशा प्रत्येक आवर्तनाबरोबर साधकाची स्वत:ची आत्मशक्ती देखील वाढते. याचे कारण काही सत्पुरुषांनी त्यांची संपूर्ण शक्ती त्या नामात प्रोक्षित केलेली असतेच, शिवाय त्यानंतर जितके शिष्य त्या नामाची आवर्तने संकल्पपूर्वक आणि श्रद्धेने करतील त्या प्रत्येक वेळी या शक्तीचा गुणाकार होऊन त्या सर्व लहरी वातावरणात संचयित स्वरूपात राहतात.

याबाबतचा एक दाखला एका वैज्ञानिक प्रयोगाद्वारे आपल्याला देता येईल. डॉ. रूपर्ट शेल्ड्रेक नावाच्या शास्त्रज्ञाने असा निष्कर्ष मांडला की, जेव्हा सायकलची नव्याने निर्मिती झाली, तेव्हा ती सायकल शिकण्यासाठी मनुष्याला जेवढा

...पान ४१ वर

सामर्थ्याने विपरीत परिस्थितीवर मात करण्याच्या मांडव्य ऋषी, दीर्घतमा ऋषी, अहल्या आख्यानातील इंद्र ब्राह्मण तसेच इतरांचे दृष्टांत देऊन श्रीरामांचा पौरुषप्रयत्नांवरचा विश्वास दृढ करतात. ते म्हणतात, ''हे रामा! कमल फुलांच्या माऱ्यामुळे ज्याप्रमाणे एखादी शिला फुटून जात नाही त्याप्रमाणे स्वाधीन आणि स्ववश झालेल्या चित्तावर आधिव्याधी, पापदृष्टी किंवा शाप यांचा कसलाही परिणाम होत नाही. ज्यांच्या मनावर हे परिणाम होतात त्यांची मने विवेक करण्याला असमर्थ आणि पौरुषरहित आहेत असे म्हणण्याला हरकत नाही. यासाठी विवेकशील मनाने अविवेकी मनाला वश करावे व पौरुष प्रयत्नांचा आश्रय करून मनाला परमार्थाच्या पवित्र मार्गाला लावावे. कारण मनाने ज्याची दृढ भावना केली ती तत्काळ घडून येते. ज्याप्रमाणे कुंभाराच्या प्रत्येक क्रियेबरोबर त्याच्या चाकावरील मातीचा गोळा आपली पूर्वस्थिती टाकून घटाकार बनत जातो त्याप्रमाणे पौरुष प्रयत्नाने केलेल्या दृढ वासनेमुळे मन आपली पूर्वीची स्थिती टाकून देत असते. योग्य तो आकार घेत असते.

प्रतिभासस्यानुपदं प्राक्तनीं स्थितिमुज्झति।
कुलालकर्मानुपदं घटो मृत्पिण्डतामिव।।

यात्रमाणे श्री वसिष्ठ मुनींनी मनाच्या ठायी असलेल्या प्रचंड सुप्त सामर्थ्याचे वर्णन करून सांगितले. देह आणि मन- देहबुद्धी आणि आत्मबुद्धी यातील सूक्ष्म फरक सांगून मनाच्या अनुसंधानात्मक सामर्थ्याच्या साह्याने पुरुषार्थ करण्याचा उपदेश केला. आत्मस्वरूपाच्या प्राप्तीसाठी उपासना, साधना, भक्ती, योग ही विविध साधने वापरली जातात. पण या सर्व साधनांच्या सिद्धतेसाठी यशस्वितेसाठी प्रचंड पुरुषार्थाची आवश्यकता असते. उपनिषदात 'न हि आत्मा बलहीनेन लभ्यते' असे स्पष्ट म्हटले आहे. श्री वसिष्ठ मुनींनीही प्रभु रामचंद्राला तोच उपदेश केला आहे.

योगवासिष्ठ हा ग्रंथ पुरुषार्थाची प्रेरणा देणारा महान ग्रंथ आहे. ती प्रेरणा घेऊन आपले जीवन पुरुषार्थ संपन्न करणे हेच खऱ्या अर्थाने योगवासिष्ठाचे चिंतन करणे होय.

पान ३६ वरून ...नामजप

काळ लागला असेल त्यापेक्षा कमी काळात तीच सायकल नव्या पिढीतला मुलगा शिकेल. स्मृतिकोशाच्या त्याच्या सिद्धांतानुसार पहिली सायकल शिकणाऱ्या मनुष्यापासून ते आजवर जितके लोक सायकल शिकले, त्यांना ज्या काही अडचणी आल्या आणि त्यावर त्यांनी ज्याप्रकारे मात केली त्या सर्व विचारलहरी वातावरणात शिल्लक राहिल्या. त्यामुळे जो मनुष्य सायकल नव्याने शिकेल आणि त्याची एकाग्रता असेल, शिकण्याची जिद्द असेल तर वातावरणातील या सर्व विचारलहरी त्याला अडचणींवर मात करायला मदत करतात आणि तो लवकर सायकल शिकतो.

हेच निष्कर्ष आध्यात्मिक प्रगतीकरता केलेल्या मंत्र पठण अथवा नामस्मरणाला लागू होतात. आजवर ज्या विशिष्ट शब्दसमुच्चयाचे विशिष्ट हेतूकरता अनेकवार उच्चारण झाले आहे, होत आहे त्या सगळ्याच्या अब्जावधी शक्ती लहरी निर्माण झाल्या आहेत आणि त्या सर्व लहरी सर्व अटी पाळून जिद्दीने पठण करणाऱ्या साधकाला मदत करतात. गुरुमुखातून घेतलेल्या नामामागेसुद्धा त्या गुरुपरंपरेची शक्ती कार्यरत असते हे या वैज्ञानिक प्रयोगाचे आध्यात्मिक तात्पर्य! संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माउली जेव्हा ईश्वराकडे पसायदान मागतात, ''जो जे वांछिल तो ते लाहो'' तेव्हा ते त्यांची सर्व आध्यात्मिक शक्ती त्या मागणीकरता पणाला लावतात. ज्ञानेश्वरीच्या श्रद्धायुक्त वाचनाने साधकांना विलक्षण अनुभव येतात ते त्यामुळेच! संत नामदेव ज्ञानेश्वरीबद्दल प्रत्येकाला तळमळीने सांगतात, ''एक तरी ओवी अनुभवावी'' प्रत्येक ओवीच्या अर्थाशी तादात्म्य साधून त्याद्वारे ज्ञानेश्वरांची प्रेरणा, स्फूर्ती आणि शक्ती साधकाला मिळावी ही अपेक्षाच नामदेव महाराज या ओवीतून व्यक्त करतात.

सर्व भौतिक, पारलौकिक इच्छा मनावर अवलंबून असतात. शरीर हे इच्छापूर्तीचे साधनमात्र असते. आध्यात्मिक प्रगती साध्य करण्यासाठी मनाची जी निश्चल, दृढ अवस्था निर्माण व्हावी लागते ती निर्माण होण्यासाठी शक्ती पुरवण्याचे काम नाम-मंत्ररूपी शब्दच करू शकतात. कारण शब्दांचे माध्यम अत्यंत प्रभावी आहे. शब्द आकार निर्माण करतात, शक्ती निर्माण करतात, विचार निर्माण करतात, आणि अनुकूल विचारांनुसार कृतीही घडवून आणतात. शब्दांचे महाप्रचंड सामर्थ्य लक्षात घेऊन त्यातले ज्ञान समजावून घेऊन त्या सामर्थ्याचा उपयोग नामजप किंवा मंत्र पठणाद्वारे अध्यात्मिक उन्नतीसाठी करणे हे प्रत्येक साधकाच्या हिताचे आहे.

(प. पू. सद्‌गुरु श्री. बापट गुरुजी यांनी ओम् सद्‌गुरु प्रतिष्ठान, बोरीवली येथे दिनांक ४ नोव्हेंबर २००४ रोजी दिलेल्या प्रवचनांवर आधारित)